कीडनियंत्रण

# कपाशीवरील शेंदरी (गुलाबी) बोंडअळीच्या बंदोबस्तासाठी जागृती मोहीम




**गिरीश जगदेव**
(आचार्य पदवी)
कृषी कीटकशास्त्र विभाग,
महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि. अहमदनगर


शेंदरी (गुलाबी) बोंडअळी ही कपाशीवरील अतिशय नुकसानकारक कीड आहे. भारतात शेंदरी बोंडअळीमध्ये बीटी कपाशीप्रती प्रतिकारक्षमता निर्माण झाली आहे. २०१७ च्या हंगामात महाराष्ट्रासह तेलंगणा, आंध्र प्रदेश, कर्नाटक, मध्य प्रदेश या राज्यांमध्ये ८ ते ९२ टक्क्यांपर्यंत प्रादुर्भाव दिसून आला. यामुळे कपाशीच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट येऊ शकते. म्हणूनच शेंदरी बोंडअळी व्यवस्थापनाविषयी सर्व स्तरांवर पुढाकार घेऊन व्यापक मोहीम हाती घेणे अत्यावश्यक आहे.

कापूस पिकाचा हंगाम डिसेंबर- जानेवारीदरम्यान संपुष्टात आणावा. कपाशीचे खोडवा किंवा फर्दड पीक घेतल्यास बोंडअळीला वर्षभर निरंतर खाद्यपुरवठा होतो व अनेक पिढ्या एका वर्षात तयार होतात.

हंगाम संपल्यावर शेतामध्ये जनावरे किंवा शेळ्या-मेंढ्या चरण्यासाठी सोडाव्यात व ताबडतोब पऱ्हाटीचा नायनाट करावा. शेतात, शेताजवळ किंवा गावामध्ये पऱ्हाटी रचून ठेवू नये.

शेतातील पिकांचे अवशेष वेचून जाळून टाकावेत.

शेत, जिनिंग मिल्स, सूतगिरणी, वखार, मार्केट यार्ड इत्यादी ठिकाणी साठविलेल्या कीडग्रस्त कापसात असलेल्या गुलाबी बोंडअळीपासून तयार होणाऱ्या पतंगांना मोठ्या प्रमाणात सामूहिकरित्या पकडण्यासाठी त्या परिसरात कामगंध सापळे व प्रकाश सापळे लावावेत. सापळ्यांमध्ये जमा झालेले पतंग नष्ट करावेत.

पूर्वहंगामी कपाशीची लागवड टाळावी.

संकरित बीटी सरळ वाणांचे बियाणे अधिकृत विक्रेत्यांकडून पक्क्या बिलासह खरेदी करावे.

शिफारस केलेल्या, कमी कालावधीत पक्व होणाऱ्या बीटी कापूस अथवा सरळ वाणाची वेळेतच पेरणी करावी.

गुलाबी बोंडअळीचा जीवनक्रम खंडित करण्यासाठी पिकाची फेरपालट करावी. अंबाडी, भेंडी, मुद्रिका अशी पिके कपाशीपूर्वी किंवा नंतर घेऊ नयेत. आश्रय ओळीसाठी (रेफ्यूजी) नियोजन करावे. देशी कापूस- पारंपरिक बिगर बीटी कापूस किंवा शिरा लावलेली भेंडी हे आश्रय पीक म्हणून लावावे. पतंगाच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी हेक्टरी ५ याप्रमाणे कामगंध सापळे लावावेत.

पिकाच्या सुरुवातीच्या वाढीच्या ३ महिन्यांपर्यंत कीटकनाशकांचा वापर टाळावा. त्यामुळे नैसर्गिक मित्रकीटकांचे संरक्षण होईल. या काळात निंबोळी अर्क ५ टक्के अधिक निमतेल ५ मि.लि./ लिटरची एक फवारणी करावी. ट्रायकोग्रामाटॉयडिया बॅक्ट्री या परोपजीवी गांधील माशीचे कार्ड (१.५ लाख अंडी / हे.) शेतामध्ये लावावेत.

जहाल विषारी किंवा ग्रे गटातील कीटकनाशकांची फवारणी टाळावी तसेच कीटकनाशकांच्या मिश्रणाचा वापर काटेकोरपणे टाळावा.

पिकाचा कालावधी वाढविणाऱ्या कीटकनाशकांचा वापर सुरुवातीच्या तीन महिन्यांमध्ये टाळावा. उदा. मोनोक्रोटोफॉस, असिफेट, इमिडाक्लोप्रिड, थायोमेथोक्झाम आणि ॲसिटप्रिमीड.

अर्थिक नुकसान पातळी ओलांडल्यास पुढीलप्रमाणे शिफारशीतील कीटकनाशकांची गरजेनुसार प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. सप्टेंबर क्विनॉलफॉस २५ ईसी २० मि.लि. किंवा थायोडीकार्ब ७५ डब्ल्यूपी २० ग्रॅम. ऑक्टोबर ते नोव्हेंबर : क्लोरोपायरिफॉस २० ईसी २५ मि.लि. किंवा थायोडीकार्ब ७५ डब्ल्यू.पी. २० ग्रॅम. डिसेंबर : फेन्वलरेट २० ईसी १० मि.लि. किंवा सायपरमेथ्रिन १० ई.सी. १० मि.लि. ■